वि.दि.दावा क्र. ५१/२०२३
संजिवकुमार वि. विरेंद्र
निशाणी क्र. १६५

वादीतर्फे साक्षीदार क्र.२
मी शपथेवर सांगतो की,
नाव- सचिन देवरावजी मोहड,
वय- ४५ वर्षे व्यवसाय- निमतनदार, भूमिअभिलेख, रामटेक

<u>सरतपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. हरिणखेडे यांच्यातर्फे शपथेवर सुरु-</u>

१. मला न्यायालयाचे साक्ष समन्स मिळाले होते. मला न्यायालयाकडुन दावा मिळकतीची मोजणी करण्याकामी आदेश मिळाला होता. गाव मौजे खैरी येथील सर्वे नं.५६ ची मोजणी करण्याचा आदेश प्राप्त झाला होता. त्यानुषंगाणे मी सर्वे नं. ५६ ची मोजणी ही दिनांक २३/०२/२०२२ रोजी केली. त्यानंतर मी मोजणी करुन मी मोजणीचा नकाशा तयार केला. मी मोजणीचा नकाशा हा तीन प्रतींमध्ये बनविला. मी क प्रत ही न्यायालयामध्ये माझ्या अहवालासोबत पाठविली. साक्षीदाराला अहवाल दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की त्यावर उप अधिक्षक भुमि अभिलेख यांची सही असुन ती मी ओळखतो. सदर अहवालास <u>नि.क्र.६६</u> देण्यात येते. सदर अहवालातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर अहवाल हा माझ्या मोजणी नकाशा नुसार बनविण्यात आलेला आहे. साक्षीदाराला मोजणी नकाशा दाखविण्यात आला. त्याने सांगितले की त्यावर त्याची सही असुन मोजणी नकाशा त्याने बनविला असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर नकाशामध्ये, हिरव्या रंगाने दाखविलेल्या भागामध्ये, वादीचे बांधकाम आहे आणि वादीचा कब्जा हा ० हेक्टर ४ आरमध्ये आहे. सदर हिरव्या रंगाची जागा ही सर्वे न.५६/२/अ ची आहे. नारंगी रंगाने दर्शविलेली जागा ही पडीत असुन, सदर जागा ही सर्वे न. ५६/२/अ ची आहे. तपकरी रंगाने दाखविली जागा ही सर्वे नं.५५ ची आहे परंतु वादीच्या ताब्यामध्ये आहे. निळया रंगाने दाखविलेली जागा ही सर्वे नं. ५५ ची असुन ती देखिल वादीच्या ताब्यामध्ये आहे. चारही रंगाने दाखविलेली जागा ही वादीच्याच ताब्यामध्ये आहे. सदर मोजणी नकाशाच <u>नि.क्र.१६६</u> देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे -</u>

प्रतिवादी गैरहजर प्रतिवादींचे विद्वान वकील हजर.
सबब, उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2024.10.21 11:30:47 +0530

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

दिनांक १०/१०/२०२४
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)